# शिवाजी विद्यापीठात उन्हाळी क्रिकेट शिबिर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागातर्फे क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर संकुलाच्या मैदानात ७ ते १९ वयोगटातील मुला-मुलींकरिता घेण्यात आलेल्या उन्हाळी क्रिकेट शिबिराची सांगता मंगळवारी झाली. या शिबिरात एकूण ४0हून अधिक मुला-मुलींनी सहभाग घेतला. शिबिरार्थींना प्रशिक्षक माजी राष्ट्रीय क्रिकेटपटू चंदाराणी कांबळे यांनी मार्गदर्शन केले, तर विद्यापीठाचे हंगामी प्रशिक्षक सुजय घोरपडे व विभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन लाभले.

Hello Kolhapur
Page No. 6 May 22, 2019
Powered by: erelego.com

# वाणिज्य क्षेत्रातील संधी

■ प्रा. ए. एम. गुरव
विभागप्रमुख, वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ

वाणिज्य व व्यवस्थापनामध्ये विविध संधी आहेत. उद्योग उभारणी पासून ते यशस्वीपणे वाढविण्यासाठी व एखाद्या आस्थापनेला कार्यरत करण्यासाठी वाणिज्य क्षेत्रला महत्त्वाचे स्थान आहे. मानवाच्या उत्क्रांतीबरोबरच वाणिज्य शास्त्राला महत्त्व व विकास झालेला आहे.

वस्तू व सेवांच्या उत्पादनासाठी मनुष्यशक्ती, पैसा, कच्चामाल, बाजारपेठा, प्रेरणा, उत्पादन पद्धती, मक्तेदारी, व्यवस्थापन, हालचाल इत्यादी घटकांची आवश्यकता असते. आणि या सर्व घटकांचा समावेश व अभ्यास वाणिज्य शास्त्रामध्ये केला जातो. वाणिज्य हे यशस्वी जीवन जगण्याचे शास्त्र असून व्यवसाय-उद्योग चालविण्याची किल्ली आहे. वाणिज्य शास्त्रामध्ये व्यवसायांसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व संसाधनाचा समन्वय कसा साधावा, याचे शिक्षण व प्रशिक्षण दिले जाते.

**कोणत्याही व्यवसायाला, उद्योगाला यशस्वी करायचे असेल तर वाणिज्याचा स्पर्श होणे आवश्यक असते. थोडक्यात वाणिज्य व व्यवस्थापन यांच्या मदतीमुळे, सहकार्यामुळे व अभ्यासामुळेच कोणत्याही व्यवसायाची प्रगती साधता येते. आपल्या व्यवसायाची स्थिती कशा प्रकारची आहे हे जाणून घेण्यासाठी, वाणिज्य व व्यवस्थापन क्षेत्र महत्त्वाचे आहे. म्हणजेच उद्योग व्यवसायाचा डॉक्टर म्हणून 'वाणिज्य व्यवस्थापन'तज्ज्ञांना मान आहे.**

मटा एज्युकेशन



## बदलाला सामोरे जाण्यासाठी

जागतिकीकरण, प्रसारीकरण व खाजगीकरण या बदलामध्ये यशस्वीपणे व्यवसाय व उद्योग करण्यासाठी प्रत्येकाला वाणिज्य व व्यवस्थापनाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. या परिस्थितीमध्ये प्रचंड बदल झालेले आहेत आणि या बदलाला सामोरे जाणेसाठी व नोकरी मिळविण्यासाठी वाणिज्य शास्त्राचे ज्ञान असणे आवश्यक आहे. जागतिकिकरणामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठांची संधी मोठया प्रमाणात निर्माण झाली आहे. या संधीचा लाभ घेण्यासाठी वाणिज्य क्षेत्र महत्त्वाचे आहे.

वाणिज्य अभ्यासक्रमाद्वारे सेवा क्षेत्र, व्यावसायिक क्षेत्र, सल्ला क्षेत्र, शिक्षण क्षेत्र, स्पर्धा परीक्षा इ. मध्ये करिअर करता येते. वाणिज्य क्षेत्रमध्ये करिअर करण्याठी खालील तीन प्रश्नांची उत्तरे स्वत:ला देणे आवश्यक आहे.

- मला काय आवडते.
- मी कोणते करिअर करू शकतो.
- मी काय करणे आवश्यक आहे.

## नोकरी

वाणिज्य व व्यवस्थापन शाखेमध्ये शिक्षण घेतल्यानंतर विविध उद्योग समूह, सरकारी क्षेत्र, व्यापार, सेवा क्षेत्र इत्यादीमध्ये नोकरी मिळू शकते. वाणिज्याचे ज्ञान असणाऱ्या उमेदवारांची गरज मोठ्या प्रमाणात आहे. विविध पदावर व विविध क्षेत्रमध्ये वाणिज्य शाखेचे शिक्षण घेतलेल्या उमेदवारांना प्रचंड संधी आहेत. उद्योग व्यवसाय चालविण्याची क्षमता असणाऱ्या उमेदवारांची गरज आहे. खासगीकरण, उदारीकरण, जागतीकीकरणाच्या स्पर्धेमध्ये टिकण्यासाठी प्रत्येक संस्थेला चांगल्या व्यवस्थापकांची अकाउंटंटची, कॅशिअरची, लेखनिकाची गरज आहे आणि म्हणून वाणिज्य क्षेत्रत शिक्षण घेतलेल्या उमेदवारांना नोकरीच्या प्रचंड संधी निर्माण झालेल्या आहेत. विविध क्षेत्रमध्ये मोठ्या प्रमाणात नोकरीच्या संधी वाणिज्य व व्यवस्थापनाचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर मिळू शकते.

## उद्योग-व्यवसाय

वाणिज्य शिक्षण पूर्ण केल्यानंतर विविध क्षेत्रमध्ये उद्योग-व्यवसाय सुरू करता येतो वाणिज्य शिक्षणाद्वारे प्रकल्प अहवाल कसा तयार करावा, व्यवसाय क्षेत्रमध्ये कोणकोणत्या संधी आहेत, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर कोणत्या व्यवसायात भविष्य आहे, कोणते नवनवीन बदल येत आहेत,राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील उद्योजकीय धोरणे कोणती आहेत, उद्योजकीय गुणांचा विकास, परस्पर व्यक्तिसंबध, कर्मचारी व्यवस्थापन, हिशोबशास्त्र व अंकशास्त्र इत्यादी विषयी ज्ञान मिळत असल्यामुळे वाणिज्य क्षेत्रतील शिक्षण पूर्ण केलेनंतर स्वतःचा व्यवसाय सुरू करता येतो.

## संशोधन

वाणिज्याच्या पदव्युत्तर शिक्षणानंतर संशोधन क्षेत्रामध्ये प्रचंड संधी निर्माण झाल्या आहेत. बाजारपेठेतील परिस्थिती झपाट्याने बदलत असल्यामुळे सातत्याने विविध क्षेत्रमध्ये संशोधनाच्या संधी उपलब्ध होत आहेत. विशेषत: अर्थशास्त्र, हिशोब शास्त्र, कर्मचारी व्यवस्थापन, उत्पादन व्यवस्थापन इत्यादी विषयामध्ये संशोधन करता येते. संशोधनाद्वारे ज्ञान निर्मितीच्या क्षेत्रामध्ये काम करता येते. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर नाव करण्यासाठी वाणिज्य विशयक संशोधन क्षेत्रमध्ये प्रचंड वाव आहे. वाणिज्यामधील ट्रेंड झपाट्याने बदलत असल्यामुळे सतत नवनवीन संशोधनाची गरज आहे. ग्राहकांच्या आवडीनिवडी बदलत असल्यामुळे वाणिज्याला संशोधन क्षेत्रमध्ये मोठ्या प्रमाणात संधी निर्माण झालेल्या आहेत. ग्राहकांचे वर्तन व मानसशास्त्र, ग्राहकांच्या आवडीनिवडी, कर्मचारी कार्यक्षमता, उत्पादनाचा खर्च कमी करणे, उत्पादकतेत वाढ करणे, संसाधनांचा पर्यायी वापर, ताण तणाव इत्यादी अनेक विषयामध्ये संशोधन करता येते. संशोधन क्षेत्रामध्ये विविध प्रकारच्या करिअरच्या संधी देशामध्ये व आंतरराष्ट्रीय पातळीवर उपलब्ध आहेत.

## सेवा क्षेत्र

वाणिज्य व व्यवस्थापन क्षेत्रतील विद्यार्थ्यांना विविध सेवा क्षेत्रामध्ये नोकरी व सेवा पुरविण्याच्या संधी आहेत. बँका, विमा संस्था, समाज उपयोगी इतर सेवा, वैद्यकीय सेवा व्यवस्थापन कार्यक्रम आयोजनाची सेवा, वाहतूक सेवा इत्यादी क्षेत्रमध्ये वाणिज्य व्यवस्थापन विशयक शिक्षण घेतल्यानंतर करिअर करता येते. संपूर्ण भारतामध्ये मोठ्या प्रमाणात सेवा क्षेत्र विकसित होत असल्यामुळे सेवा क्षेत्रामध्ये फार मोठ्या प्रमाणात संधी निर्माण झाल्या आहेत. सेवा क्षेत्र हे व्यक्तिगत कौशल्यावर आधारित असल्यामुळे या क्षेत्रामध्ये वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेतील विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात विशेष प्रकारच्या संधी निर्माण झालेल्या आहेत.

## सल्ला केंद्र

वणिज्य व व्यवस्थापन क्षेत्रातील विद्यार्थ्यांना पदवी व पदव्युत्तर शिक्षणानंतर सल्ला केंद्र स्थापन करता येते. कर, हिशोब, व्यवस्थापन विपणन, जाहिरात, शिक्षण, उद्योग, कर्मचारी नियुक्ती शेती विषयक उत्पादन व विक्री, टुरिझम इत्यादी क्षेत्रमध्ये सल्ला केंद्र सुरू करता येतात. याबरोबरच प्रशिक्षण, घटना आयोजन, कायदेविशयक मार्गदर्शन इ. सल्ला केंद्रे सुरू करता येतात. वाणिज्य व व्यवस्थापन विद्यार्थ्यांना परिणामकारक व प्रभावी स्वरूपाचे सल्ला केंद्र सुरु करता येते. उदाहरण म्हणून करविषयक सल्ला केंद्र सुरू केल्यास विविध प्रकारचे कर विशयक सल्ले व्यक्ती, संस्था, उद्योग इत्यादींना देता येतात. या क्षेत्रात प्रचंड संधी उपलब्ध आहेत.

## स्पर्धा परीक्षा

वाणिज्य क्षेत्रातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षेद्वारे करियर करता येते. एम. पी. एस. सी. निवड मंडळ, जिल्हा परिषद, स्टाफ सिलेक्शन बँका, इत्यादींमध्ये स्पर्धा परिक्षाद्वारे उमेदवारांची निवड केली जाते. या परिक्षांद्वारे वाणिज्यच्या उमेदवारांना संधी आहेत. एम. पी. एस. सी. व यू. पी. एस. सी. मध्ये कॉमर्सच्या विद्यार्थ्यांना विशेष संधी आहेत त्याचा लाभ घेणे आवश्यक आहे.

(पूर्वार्ध)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 MAY 2019

पुढारी

# उन्हाळी सत्र परीक्षांचे निकाल जाहीर

कोल्हापूर (प्रतिनिधी) : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या विविध अभ्यासक्रमांच्या ७० उन्हाळी सत्र परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत. विद्यापीठ परीक्षा विभागातर्फे उन्हाळी सत्र परीक्षा घेण्यात आल्या. यातील विविध अभ्यासक्रमांच्या ४०० पैकी ७० परीक्षांचे निकाल जाहीर झाल्याची माहिती विद्यापीठातील सूत्रांकडून समजते.

सकाळ

# विद्यापीठात पीएच.डी. प्रवेश परीक्षा

## विविध विद्याशाखांच्या १६८ जणांनी दिली परीक्षा



> आतापर्यंत सुमारे ४०० परीक्षा पूर्ण झाल्या असून, त्यातील ७० परीक्षांचे निकालही लागले आहेत. आतापर्यंत सर्व परीक्षा आणि निकाल हे विहित कालावधीत पूर्ण झाले आहेत.
>
> - महेश काकडे (परीक्षा नियंत्रक, शिवाजी विद्यापीठ)

कोल्हापूर, ता. २१ : शिवाजी विद्यापीठामध्ये २०१८-१९ वर्षातील एम.फिल. आणि पीएच.डी.च्या रिक्त जागांसाठी आज परीक्षा घेण्यात आली. यामध्ये विविध विद्याशाखांच्या सुमारे १६८ विद्यार्थ्यांनी या प्रवेश परीक्षा दिल्या, अशी माहिती शिवाजी विद्यापीठातील परीक्षा विभागाने दिली आहे. या वर्षामध्ये एम.फिल., पीएच.डी.च्या काही जागा रिक्त होत्या. त्या जागा भरण्यासाठी स्वतंत्र प्रवेश परीक्षा घेण्यात आली. एकाच दिवशी तीन टप्प्यांत या परीक्षा झाल्या. या परीक्षांसाठी विशेष ड्राईव्ह घेण्यात आला. यामध्ये सकाळी १० ते १, १ ते ३, ४ ते ६, या वेळांमध्ये परीक्षा झाल्या. एकूण १६८ विद्यार्थी, विद्यार्थिनींनी प्रवेश परीक्षा दिली. अशी माहिती विद्यापीठ प्रशासनाने दिली आहे.

Kolhapur, Main
22/05/2019 Page No. 5

लोकमत

## शिवाजी विद्यापीठ : एम.फिल., पीएच.डी.साठी 'स्पेशल ड्राईव्ह' सुरु

# चारशेपैकी ७० परीक्षांचे निकाल जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील चारशे परीक्षा आतापर्यंत झाल्या आहेत. त्यापैकी ७० परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत. एम. फिल., पीएच.डी. प्रवेशासाठी 'स्पेशल ॲडमिशन ड्राईव्ह'अंतर्गत परीक्षा मंगळवारपासून सुरु झाली. पहिल्या दिवशी एकूण १६२ जणांनी परीक्षा दिली.

### आकडेवारी दृष्टिक्षेपात

- उन्हाळी सत्रात होणाऱ्या एकूण परीक्षा : ६४०
- परीक्षार्थी : दोन लाख ९० हजार
- परीक्षा केंद्रे : २८३
- आतापर्यंत झालेल्या परीक्षा : ४००
- उर्वरित परीक्षांची संख्या : २४०



विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून दि. २६ मार्चपासून उन्हाळी सत्रातील परीक्षा सुरु झाल्या. आतापर्यंत मास्टर ऑफ रुरल डेव्हलपमेंटस् कॉमर्स, आयटी बी. कॉम., बी.ए. बीएड., बीबीए, बीसीए, बी.एस्सी., एम. एस्सी., अशा विविध अभ्यासक्रमांच्या एकूण चारशे परीक्षा पूर्ण झाल्या आहेत. त्यापैकी ७० परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. त्यामध्ये अभ्यासक्रमांच्या दोन, चार, सहा, आदी सत्रांचा समावेश आहे. बहुतांश निकाल हे ४५ दिवसांच्या मुदतीत जाहीर झाले आहेत. एम. फिल., पीएच. डी. प्रवेशासाठी परीक्षा व मूल्यमापन मंडळाने 'स्पेशल ॲडमिशन ड्राईव्ह' आयोजित केला आहे. त्याअंतर्गत मंगळवारपासून प्रवेश परीक्षा सुरु झाल्या. बिझनेस मॅनेजमेंट, शिक्षणशास्त्र, वनस्पतीशास्त्र, केमिकल इंजिनिअरिंग, फार्मसी, तत्त्वज्ञान, मेकॅनिकल इंजिनिअरिंग, अर्थशास्त्र, अकौंटन्सी, बिझनेस इकॉनॉमिक्स कॉमर्स, आदी १८ अभ्यासक्रमांसाठी ऑफलाईन पद्धतीने प्रवेश परीक्षा होत आहे. सकाळी दहा ते दुपारी बारा, दुपारी एक ते तीन व दुपारी चार ते सायंकाळी सहा या तीन सत्रांमध्ये एकूण १६२ जणांनी परीक्षा दिली. या परीक्षांसाठी १९६ जणांनी नोंदणी केली. त्यापैकी ३४ जण गैरहजर राहिले. आज, बुधवारी प्रवेश परीक्षा होणार आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी मंगळवारी दिली.